VOLUME 5 ISSUE 11 NOVEMBER 2020

*Progressive Education Society's*

**Modern College of Arts, Science and Commerce ( Autonomous )**

**Shivajinagar, Pune-411005. Maharashtra**

# *MODLIB E-Bulletin of Library and Information Centre*




**'दिवाळी'-Marathi Poem penned down by Respected Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir on the occasion of Diwali on 13th November 2020.**

**Published by :** Dr. Rajendra S. Zunjarrao, Principal, MCASC (Autonomous) , Shivajinagar, Pune-05.
**Editor :** Dr. Shantashree Sengupta, Librarian.
**Editorial Assistant :** Mrs. Sarika Sable
**Website :** http://www.mcasclib.com/ ; **E-mail:** libraran@moderncollegepune.edu.in



## *Table of Contents*


| Sr.No. | Topic | Page No.s |
|---|---|---|
| 1 | Interview of Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote Madam | 3-4 |
| 2 | November Report of Institutional Repository (IR@MCASC) | 5 |
| 3 | International Recognition of Institutional Repository@MCASC | 6 |
| 4 | Events conducted by Library | |
| | *- Pandit Jawaharlal Nehru Jayanti* | 7 |
| | *- Birsa Munda Jayanti* | 8 |
| | *- Indira Gandhi Jayanti and Rashtriya Ekatmata Din* | 9 |
| | *- Sanvidhan Diwas* | 10-11 |
| 5 | Events organised by Departments | |
| | *-PTA Meeting for FY Biotech and Blended Science Students by Department of Biotechnology* | 13 |
| 6 | Modern Achievements | |
| | *-Prof. Barnali Das, Department of Geography* | 15 |
| 7 | Modern Alumni Achievements | |
| | *-Shri. Surendra Sable* | 16 |
| 8 | Newly Added Books in the Library | 17 |
| 9 | Newspaper Clippings | |
| | *- Related to MCASC, Pune-5* | 19-22 |
| | *- Education* | 23-129 |
| | *- Miscellaneous* | 130-134 |
| 10 | Upcoming Events | 135 |

# Report of Institutional Repository (IR@MCASC)- November 2020

In the COVID-19 pandemic situation, with the help of Institutional Repository@MCASC, Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 is able to reach out to students by providing them e-contents, lecture notes prepared by respective teachers and scanned reading materials selected by the teachers.

We are thankful to the following teachers and departments for their contribution in IR@MCASC during November 2020:

## CATEGORY: LECTURE NOTES/BOOK CHAPTERS




- **TYBA PSYCHOLOGY**– Prof. Dr. Amruta S. Oke
- **FYBSc ELECTRONIC SCIENCE**– Prof. S.R. Chaudhari
- **SYBA POLITICAL SCIENCE** — Prof. D.L.Khokale
- **TYBSc MATHEMATICS**-Prof. Pooja M. Paratne
- **M.A. MARATHI PART II**– Prof.Dr.Vaijayanti Jadhav
- **SYBCOM-BUSINESS ECONOMICS**– Prof. Padmashri Majumdar
- **SYBSc PHYSICS**-Prof. Sanket Gogte

## CATEGORY: ECONTENTS BY FACULTY MEMBERS

- **TYBSc MATHEMATICS**- Prof. Pooja M. Paratne
- **FYBCOM (BUSINESS MATHEMATICS & STATISTICS)**- Prof. Pooja M. Paratne
- **FYBA GERMAN**- Prof. Sneha Mahajan
- **SYBA GERMAN SPECIAL**- Prof. Sneha Mahajan
- **SYBSc PHYSICS**– Prof. Sanket Gogte

## CATEGORY: WORKSHEETS/ASSIGNMENTS

- **FYBA, SYBA, TYBA GERMAN**— Prof. Sneha Mahajan






# International Recognition of Institutional Repository (IR@MCASC)








**DSpace @ Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5** is included in Registry of Open Access Repositories with **ROAR ID: 16072** ( http://roar.eprints.org/16220/ ).

**DSpace @ P.E.Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous)** is included in Directory of Open Access Repositories (OpenDOAR) with **OpenDOAR ID: 9988** ( https://v2.sherpa.ac.uk/id/repository/9988 ).

**I am very much thankful to all the Respected Members of Management of Progressive Education Society, Principal Dr. R. S. Zunjarrao Sir, Prof. Shamkant S. Deshmukh Sir for giving us an opportunity to develop the Institutional Repository (IR@MCASC) ( http://125.99.47.158:8090/jspui/ ) which showcases the intellectual output of our faculty members and students, along with College Magazines, Annual Reports, Open Educational Resources etc. and is now indexed by the Largest International Databases of Repositories-Registry of Open Access Repositories (ROAR) and Directory of Open Access Repositories (OpenDOAR).** This is big achievement for us as our work is now recognized in the global platform and very few institutions are having active Institutional Repositories. IR@MCASC allows browsing by Author, Subject/Keyword, Title, Keyword and Issue Date. This will help in increasing the global visibility of all the contents of institutional repository.

The library staff members have also helped in scanning the documents in the scanners which are then uploaded in the repository.

I am also thankful to the faculty members of our college who have been supporting the cause of depositing items in the repository which has proved to be very useful in the COVID-19 pandemic situation when students are not able to visit the college library physically. With the help of IR@MCASC, we are able to deliver the reading materials (presently there are more than 700 items in the repository) to their doorsteps.

**-Dr. Shantashree Sengupta**
**Librarian**

# Events Conducted in the Library During November 2020

## 1. Pandit Nehru Jayanti : 14th November 2020

Birth Anniversary of Pandit Jawaharlal Nehru ( 14 November 1889 – 27 May 1964) was celebrated in the Library. Principal Dr. R. S. Zunjarrao, Librarian Dr. S. S. Sengupta, teaching staff, non teaching staff and students were present for the event. Pandit Jawaharlal Nehru was an Indian independence activist, and subsequently, the first Prime Minister of India and a central figure in Indian politics before and after independence. He emerged as an eminent leader of the Indian independence movement and served India as Prime Minister from its establishment as an independent nation in 1947 until his death in 1964. He has been described by the Amar Chitra Katha as the architect of India. Indian children knew him as Chacha Nehru.

Principal Dr. R. S. Zunjarrao, Librarian Dr. S. S. Sengupta, Shri. Amit Salunke and library staff were present for the birth anniversary. The programme was organised by following all the precautionary measures of COVID-19 pandemic situation.





Events Conducted in the Library During November 2020

## 2. Birsa Munda Jayanti :15th November 2020

Birth Anniversary of Birsa Munda was Celebrated in the Library who was an Indian tribal freedom fighter, religious leader, and folk hero who belonged to the Munda tribe. He spear-headed an tribal religious Millenarian movement that arose in the Bengal Presidency (now Jharkhand) in the late 19th century, during the British Raj, thereby making him an important figure in the history of the Indian independence movement. Principal Dr. R. S. Zunjarrao, Librarian Dr. S. S. Sengupta, Shri. Amit Salunke and library staff were present for the birth anniversary. The programme was organised by following all the precautionary measures of COVID-19 pandemic situation.



## *Events Conducted in the Library During November 2020*

### 3. Indira Gandhi Jayanti and Rashtriya Ekatmata Din : 19th November 2020

On 19th November 2020, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern college of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated the Birth Anniversary of *First Women Prime Minister of India Shrimati Indira Gandhi. Indira Gandhiji's Jayanti is also known as 'Rashtriya Ekatmata Diwas'* and as per the instructions in Government of Maharashtra's GR, 'Rashtriya Ekatmata Shapath' is also taken.

Under the guidance of Respected Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir, College Librarian Dr. Shantashree Sengupta and Library Staff took the 'Rashtriya Ekatmata Shapath' and later Principal Sir briefly addressed the contributions of the Late Prime Minister of India towards the nation.

All the rules of physical distancing were followed during the programme. I am thankful to the library staff members who were present during the programme.

Regards,
Dr.Shantashree Sengupta,
Librarian.


राष्ट्रीय एकात्मता शपथ

" मी गांभीर्यपूर्वक शपथ घेतो/ घेते की, देशाचे स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय एकात्मता अबाधित राखण्यासाठी व दृढ करण्यासाठी मी निष्ठापूर्वक काम करीन"
मी अशीही प्रतिज्ञा करतो/करते की, मी कधीही हिंसाचाराचा अवलंब करणार नाही. तसेच मी सर्व धार्मिक, भाषिक किंवा प्रादेशिक मतभेद व तंटे किंवा इतर राजकीय वा आर्थिक गाऱ्हाणी शांततामय आणि सांविधानिक मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न चालू ठेवीन.





## *Events Conducted in the Library During November 2020*

### 4. Samvidhan Divas : 26th November 2020


भारताचे संविधान

आम्ही, भारताचे लोक,
भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य
घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार,
अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे
स्वातंत्र्य ; दर्जाची व संधीची समानता;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये
व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
आमच्या संविधानसभेत आज दिनांक सव्वीस
नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे
संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वतःप्रत अर्पण करत आहोत.





The Library and Information Centre on 26.11.2020 under the guidance of Respected Principal Dr.R.S.Zunjarrao Sir celebrated the *Constitution Day (National Law Day), also known as Samvidhan Divas*. Samvidhan Diwas is celebrated in India on 26 November every year to commemorate the adoption of the Constitution of India. On 26 November 1949, the Constituent Assembly of India adopted the Constitution of India, and it came into effect on 26 January 1950. The Government of India declared 26 November as Constitution Day on 19 November 2015 by a gazette notification.
The programme which was organised in library by keeping into consideration all the rules and regulations of physical distancing, began with Welcome of Respected Principal Sir, Staff Members and brief introduction by College Librarian Dr.S.S.Sengupta. Respected Principal Sir and the staff present in the library, paid their respect to Dr.B.R.Ambedkarji and the Constitution Preamble.
It was followed by the reading of Preamble of the Constitution of India by all.
Principal Sir addressed us regarding the importance of Samvidhan for the Nation and in our Life. Sir also highlighted the important contribution and ideologies of Bharatratna Dr.B.R.Ambedkar and what we all can learn from his life.
NSS Officer Prof.Dr.P.S.Varade gave the vote of thanks for the programme. All the precautions of COVID-19 were taken during the programme.
I am thankful to Principal Dr. R. S. Zunjarrao Sir, Junior College Supervisor Prof.S.J.Karekar Sir, Prof. Milind Bodke Sir, College NSS Programme Officer Prof.Dr.P.S. Varade Sir, Prof. Dr.Vaijayantimala Jadhav Madam and the library staff members who were present for the programme.
Regards,

## *Events Conducted in the Library During November 2020*





# *Events organized by Departments during November 2020*

# *Department of Biotechnology :*
# *PTA meeting for FY Biotech & Blended students*

Department of biotechnology has organized *PTA meeting for FY Biotechnology & Blended students* on Saturday 07th November from 11 am to 12.45 pm.




















# Modern Achievements
# –November 2020

# *Prof. Barnali Das, Department of Geography*



Certificate of Presenter

This is to certify that

Barnali Das

has participated to "the 1st Intercontinental Geoinformation Days (IGD)" organized by Mersin University Faculty of Engineering, Department of Geomatics Engineering in Mersin, Turkey on November 25-26, 2020

Intercontinental Geoinformation Days

(Paper number 05) Assessment of shoreline change and its relation with Mangrove vegetation: A case study over North Konkan region of Raigad, Maharashtra, India

Author(s): Barnali Das*, Anargha Dhorde

Prof. Dr. Murat YAKAR
Symposium Chair

Prof.Barnali Das, Department of Geography participated in **The 1st Intercontinental Geoinformation Days (IGD)** organised by Mersin University, Faculty of Engineering, Department of Geomatics Engineering in Mersin, Turkey on 25th– 26th November 2020.

Prof.Barnali Das presented a paper on *'Assessment of shoreline change and its relation with Mangrove vegetation: A case study over North Konkan region of Raigad, Maharashtra, India.'* The conference took place on online platform.






# *Modern Alumni Achievements*

**श्री. सुरेंद्र साबळे, पोलीस नाईक, गुन्हे शाखा, युनिट ०४, पुणे (मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे-५ चे माजी विद्यार्थी व श्री प्रकाश साबळे, सहाय्यक ग्रंथपाल, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे-५ यांचे लहान बंधू) यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने नागरिकांना कोट्यावधी रुपयांचा गंडा घालणाऱ्या गुन्हेगारास अटक केली. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.**



'आर्ट ऑफ लिव्हिंग' संस्थेशी संबंधित असल्याचे भासवून फसवणूक

पुणे, दि. २३ (प्रतिनिधी) - 'आर्ट ऑफ लिव्हिंग' संस्थेत प्रवेश मिळवून डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट को-ऑर्डिनेटर पदावर असल्याचा बनाव करून बोगस जे. के. व्हेंचेर्स नावाची कंपनी स्थापन करून नागरिकांना कोट्यवधी रुपयांचा गंडा घालणाऱ्याला गुन्हे शाखेने अटक केले.

प्रणय उदय खरे (वय २८, रा. साळुंखे विहार, कोंढवा) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी अश्विनीकुमार बळीराम कांबळे (वय ४४) यांनी चतुःशृंगी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. प्रणयने पुण्यातील आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेत प्रवेश मिळवून डिस्ट्रिक डेव्हलपमेंट कोऑर्डिनेटर पदावर असल्याचा बनाव केला. त्यानंतर बोगस जे. के. व्हेंचेर्स नावाची कंपनी स्थापन करीत त्याने कंपनी आर्ट ऑफ लिव्हिंगशी संबंधित असल्याचे गुंतवणूकदारांना भासविले. त्यानंतर रत्नागिरीत तब्बल ७ हजार एकर जागा घेतल्याचे सांगितले. संबंधित जागेत १५ वर्षासाठी गुंतवणूक केल्यास पहिल्या ११ गुंतवणूकदारांना १ कोटी रुपये देण्याचे आमिष दाखविले. त्यानुसार अश्विनीकुमार यांनी २०१७ मध्ये जे. के. व्हेंचेर्स कंपनीत १ कोटी ४५ लाख १७ हजार रुपये गुंतविले. मात्र, प्रणयने त्यांना मोबदला दिला नाही. ही कामगिरी पोलीस उपायुक्त बच्चन सिंह, सहायक पोलीस आयुक्त लक्ष्मण बोराटे, पोलीस निरीक्षक राजेश निर्मल, पोलीस उपनिरीक्षक दीपक माने, पोलीस उपनिरीक्षक शशिकांत शिंदे, गीता पाटील, शंकर पाटील, गणेश साळुंके, राजस शेख, सुरेंद्र साबळे, सचिन ढवळे, प्रवीण कराळे, प्रवीण भालचिम, नागेश कुवर, दत्तात्रय फुलसुंदर यांच्या पथकाने केली.

**Saamana: 24.11.2020**




Image Courtesy: Google Images



पुढारी

'आर्ट ऑफ लिव्हिंग'च्या नावे कोट्यवधींची फसवणूक

प्रणय खरेला अटक; पोलिस कोठडीत रवानगी

विविध योजनांत गुंतवणुकीच्या बहाण्याचे अनेकांना घातला गंडा

फसवणुकीचा आकडा वाढण्याची शक्यता

पुणे : पुढारी वृत्तसेवा

आध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकर यांच्या आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेचा जिल्हा समन्वयक असल्याचे भासवत गुंतवणुकीच्या वेगवेगळ्या योजना सांगून नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्याला गुन्हे शाखेच्या युनिट ४ ने बेड्या ठोकल्या आहेत. प्रणय उदय खरे (रा. मोनार्च गार्डन सोसायटी, साळुंखे विहार) यास त्याचे नाव असून, याप्रकरणी अश्विनीकुमार कांबळे (४४, रा. औंध) यांनी चतुःशृंगी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. याप्रकरणात फसवणूक झालेले तीन गुंतवणूकदार समोर आले असून, आकडा वाढण्याची शक्यता पोलिस उपायुक्त गुन्हे बच्चन सिंह यांनी वर्तवली.

श्री श्री रविशंकर यांच्या आर्ट ऑफ लिव्हिंगचे मुख्यालय बंगळुरू येथील उदयपूर येथे आहे. या संस्थेच्या देशभरात शाखा आहे. या शाखांतून नागरिकांना ध्यान-धारणेचे प्रशिक्षण व महत्त्व पटवून देण्याचे काम केले जाते. त्यांच्या पुण्यातदेखील शाखा आहेत. याचाच फायदा घेत प्रणय खरे याने आपण या संस्थेचा जिल्हा समन्वयक असल्याचा बनाव केला. त्याआधारे ऑर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेत प्रवेश मिळवून देण्याच्या बहाण्याने त्यांच्या जे. के. व्हेंचर्स कंपनीत मोफत कार्यशाळा आयोजित केल्या. ही कंपनी ऑर्ट ऑफ लिव्हिंग या संस्थेशी संबंधित असल्याबाबत नागरिकांना माहिती देऊन तो आर्थिक गुंतवणुकीच्या वेगवेगळ्या योजना सांगत होता. याद्वारे तो नागरिकांचा विश्वास संपादन करून मोठमोठ्या रकमा घेऊन त्या रकमेचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर करीत होता. दाखल गुन्ह्यानुसार, त्याने जे. के. व्हेंचर्स नावाची बोगस कंपनी स्थापन करून कंपनीमार्फत रत्नागिरी येथील खेडमध्ये सात हजार एकर जागा घेत आहे, असे तो नागरिकांना सांगत होता. त्या जागेमध्ये १५ वर्षांकरिता १ एकर जागेसाठी गुंतवणूक केल्यास पहिल्या अकरा गुंतवणूकदारांना एक कोटी रुपये, त्यानंतरच्या ५० गुंतवणूकदारांना ५० लाख रुपये तर त्यानंतरच्या उर्वरित गुंतवणूकदारांना ४० लाख रुपये सहा वर्षांनी टप्याटप्याने दिले जातील, असे आमिष दाखविले. तसेच शॉर्ट टर्म योजनेत व मोरींगा झाडे लावण्याच्या योजनेत पैसे गुंतविल्यास भरपूर नफा मिळेल, असे भासवून एकूण १ कोटी ४५ हजार रुपयांची फिर्यादींची फसवणूक केली.

"आरोपी खरे याने विविध प्रकारच्या कंपन्या स्थापन केल्या आहेत. काही महत्वाची कागदपत्रे मिळून आली असून, २० बँक खाती असल्याचेदेखील समोर आले आहे. स्किमच्या माध्यमातून नागरिकांना गुंतवणुकीचे आमिष दाखवून फसविल्याचे समोर आले आहे. खरे सहा महिन्यांपासून पोलिसांना गुंगारा देत होता. अशाप्रकारे कोणाची फसवणूक झाली असेल, तर त्यांनी गुन्हे शाखेच्या युनिट चारच्या खडकी रेंजहिल येथील कार्यालयात संपर्क साधावा.

**रजनीश निर्मल**, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, गुन्हे शाखा, युनिट चार

**नाव खरे, काम खोटे**

प्रणय खरे असे नाव आरोपीचे असून काम मात्र खोटे व फसवणुकीचे करीत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. खरे याने विस्तार ३६०, दि योगीक, एएचओ लाईफ स्टाईल प्रायव्हेट लिमिटेड, प्रगल्स मीडिया प्रायव्हेट लिमिटेड नावाने कंपन्या स्थापन करून त्याने वेगवेगळ्या योजना सांगून शहरातील व बाहेरील नागरिकांना फसविले. याप्रकरणी त्याला चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली. ही कारवाई सहायक पोलिस आयुक्त लक्ष्मण बोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक रजनीश निर्मल, उपनिरीक्षक दीपक माने, शशिकांत शिंदे, गीता पाटील, कर्मचारी शंकर पाटील, गणेश साळुंखे, राजस शेख, सुरेंद्र साबळे, सचिन ढवळे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

**असा रचला ठगवण्याचा डाव**

आरोपी खरे हा ठग आहे. गुंतवणूकदारांना आपल्या जाळ्यात खेचण्यासाठी त्याने प्रथम पुण्यातील आर्ट ऑफ लिव्हिंगच्या केंद्रात प्रवेश घेतला. त्या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांना तो तेथील पदाधिकारी असल्याचे भासवत असे. नागरिकांना विश्वास वाटावा म्हणून सुरुवातीपासूनच त्याने तो हायप्रोफाईल व्यावसायिक असल्याचे दाखवत असे. एवढेच नाही तर तेथील काही कार्यक्रमाला त्याने निधीही दिला. पुढे आलेल्या भाविकांना खेड-रत्नागिरी येथे जमीन खरेदी केली आहे. तेथे तो चंदनाची व शेवग्याची झाडे लावून व्यावसाय करणार असल्याचे सांगत होता. नागरिकांनासुद्धा वाटले हा एवढा आध्यात्मिक आहे. त्यामुळे तो फसवणूक करणार नाही. याच विश्वासावर त्याच्याकडे काही लोकांनी गुंतवणूक केली. मात्र, त्याने सावज हेरून अनेकांना आर्थिक गंडा घातला.

Pune Edition
Nov 24, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# NEWLY ADDED BOOKS DURING NOVEMBER 2020

| Author | Title |
|---|---|
| Pattanaik, Devdutt | Sita : An Illustrated Retelling of The Ramayana |
| Pattanaik, Devdutt | Jaya : An Illustrated Retelling of The Mahabharata |
| Sharma, Robin | Greatness Guide 2 |
| Shikarkhane, Neelima | Maharashtratil Aadhunik Sant : महाराष्ट्रातील आधुनिक संत |
| Zende, Jayprakash Bhalchandra | Yashopraptisathi Prerak Charitre : यशोप्राप्तीसाठी प्रेरक चरित्रे |
| Kelkar, Bhalbha | Prachin Bharatiya Shastradnya Aani Sanshodhak : प्राचीन भारतीय शास्त्रज्ञ आणि संशोधक |
| Joshi, Manjusha / Patil, Sambhaji | Maharashtratil Rajkiy Vyaktimatve : महाराष्ट्रातील राजकीय व्यक्तिमत्वे |
| Lele, Jayant / Pawar, Prakash Ed. | Bharat Samaj Aani Rajkaran : भारत समाज आणि राजकारण |
| Desai, Jayashri | Ayodhyaet Shriramachi Vijaypataka : अयोध्येत श्रीरामाची विजयपताका |
| Ganachari, Aravind / Wamburkar, Jaswandi Tr. | Gopal Ganesh Agarkar : गोपाळ गणेश आगरकर |
| Pattanaik, Devdutt / Sadavarte, Abhay Tr. | Mazi Gita : माझी गीता |
| Kulkarni, Medha | Ladhe Aani Tidhe Chikitsak Gappa Pushpabaishi : लढे आणि तिढे चिकित्सक गप्पा पुष्पबाईशी |
| Kakade, Dinkar V. | Bhartatil Mahan Striya : भारतातील महान स्त्रिया |
























# News Paper Clippings : November 2020



Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf* ]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time. As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service. The E-Newspaper Clippings Section is divided into *News regarding MCASC, Pune-5, Education, Work of Appreciation, Health, Research, Sports, Miscellaneous* .



# News Paper Clippings During November 2020

*Section: Work of Appreciation*



## विद्यापीठातर्फे गुळवेलीचे वाटप

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे 'समृद्ध जीवनासाठी गुळवेली' (अमृता फॉर लाइफ) ही मोहीम राबविण्यात येत आहे. कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना गुळवेल रोपांचे वाटप करून मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी अतुल पाटणकर, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील अध्यासनाचे प्रमुख डॉ. मुकुंद तापकीर, वनस्पतिशास्त्र विभागाचे प्रा. मिलिंद सरदेसाई उपस्थित होते. वैद्य महेश पाटील व मानसी पाटील यांनी गुळवेलीचा वापर, प्रमाण, आयुर्वेदातील महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.

दोन लाख रोपांचे मोफत वाटप या मोहिमेद्वारे करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात प्रकल्पातून राज्यात २५ हजार रोपे तयार करण्यात आली आहेत. मोहिमेंतर्गत मागेल त्यास गुळवेली रोपे मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहेत. अधिक माहितीसाठी डॉ. दिगंबर मोकाटे (९४२०९०७०९८) यांच्याशी संपर्क साधावा; अथवा केंद्रास सायंकाळी ४ ते ६ या वेळेत भेट देऊन रोपे घेऊन जावीत, असे करण्यात आले आहे.

**Maharashtra Times: 14.11.2020**



## आयईईई-विद्यापीठात शैक्षणिक करार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एसपीपीयू रिसर्च पार्क फाउंडेशन व इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीअर्स (आयईईई) पुणे शाखा यांच्यात नुकताच करार करण्यात आला. या करारानुसार 'परवडणारी शेती' आणि 'आरोग्य सेवा' या दोन प्रमुख क्षेत्रांमध्ये या दोन्ही संस्था एकत्रित काम करतील. या कराराद्वारे 'आयईईई'च्या जगभरातील सदस्यांचे कौशल्य आणि अनुभव यांचा फायदा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थी व प्राध्यापक यांना होणार आहे.

करारावर स्वाक्षरी करतेवेळी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, रिसर्च पार्क फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अरविंद शाळिग्राम, 'आयईईई'च्या पुणे शाखेचे अध्यक्ष गिरीश खिलारी, उपाध्यक्ष जगदीश चौधरी, विश्वकल्याण गुरुकुल सेवा फाउंडेशनचे संचालक विनायक छत्रे, संचालक सत्यजित जोगळेकर, सल्लागार समितीचे सदस्य श्रीकांत छत्रे, संजीवनी जोगळेकर, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुरेश गोसावी, तंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. आदित्य अभ्यंकर आदी उपस्थित होते.

'आयईईई पुणे शाखेसोबत झालेल्या करारानुसार येत्या काळात विविध कार्यक्रम राबविले जाणार आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा, कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम यासोबतच संशोधनासाठी एक विशेष प्रयोगशाळा काही महिन्यात सुरू केली जाणार आहे. यासाठी 'आयईईई'कडून निधी मिळणार आहे,' असे डॉ. शाळिग्राम यांनी सांगितले.

### यावर होणार संशोधन

या कराराच्या माध्यमातून उभ्या राहणाऱ्या प्रयोगशाळेच्या माध्यमातून शेतीसाठी आवश्यक अवजारे, खते, कीटकनाशके, आरोग्य सेवेसंदर्भातील संशोधन केले जाणार आहे. सर्वच शाखांमधील विद्यार्थी या सुविधेचा लाभ घेऊ शकतील. संशोधन प्रकल्प करू शकतील.

**Maharashtra Times: 15.11.2020**



News Paper Clippings During November 2020

Section: Work of Appreciation



## 'डिजिटल शेती'बाबत सेंटर फॉर एक्सलन्स

### विद्यापीठ आणि आयडिया लॅब्जमध्ये करार

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'उदयोन्मुख तंत्रज्ञानासह डिजिटल शेती' या विषयावरील सेंटर फॉर एक्सलन्स विद्यापीठात सुरू करण्यात येणार आहे. उदयोन्मुख तंत्रज्ञानासह डिजिटल शेती या विषयावर काम करणाऱ्या स्टार्टअप्ससाठी या केंद्रातर्फे मार्गदर्शन केले जाणार आहे.

या केंद्रात उदयोन्मुख तंत्रज्ञानावरील डिजिटल प्रयोगशाळा आणि मेकर स्पेस यांचा समावेश असेल. याशिवाय हॅकेथॉन्स, अॅक्सिलरेटर असे इनोव्हेशनमधील विविध कार्यक्रमांचे वर्षभर आयोजन केले जाणार आहे. या केंद्रासाठी सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड एंटरप्राइजेस या विभागाने आयडिया लॅब्ज फ्युचरटेक व्हेंचर्स यांच्याशी करार केला असून, कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि आयडिया लॅब्ज फ्युचरटेक व्हेंचर्सचे संस्थापक पंकज दिवाण यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या वेळी कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

'हे उत्कृष्टता केंद्र चालवताना आयडिया लॅब्ज यांच्याकडे असलेल्या योग्य कौशल्याच फायदा होणार आहे,' असे सेंटर फॉर इनोवेशन, इनक्यूबेशन अँड एंटरप्राइजेसच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर यांनी सांगितले.

> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड एंटरप्रायजेस या विभागाद्वारे नवनवीन संशोधन करण्यासाठी आम्ही प्रामुख्याने शेती या विषयावर लक्ष केंद्रित केले आहे.
> - डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**Maharashtra Times: 15.11.2020**



## पुणे विद्यापीठाचा 'लोककला २०२०' अभिनव उपक्रम

प्रभात वृत्तसेवा

### लोककलावंतांना कला सादर करण्याची संधी

### प्रेक्षकांना ऑनलाइन घेता येणार कलेचा आनंद

पुणे, दि. २४ - करोनामुळे गेले सात-आठ महिने लोककलावंतांना त्यांचे कार्यक्रम सादर करता आले नाहीत. वंशपरंपरेने आपापल्या लोककलांचे जतन करणाऱ्या लोककलावंतांवर यामुळे उपासमारीची वेळ आली आहे. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भारतीय लोककला अभ्यास, संशोधन आणि कल्याण केंद्रातर्फे 'लोककला २०२०' हा अभिनव उपक्रम राबवला जाणार आहे.

या उपक्रमांतर्गत सलग २० दिवस दररोज २० मिनिटे याप्रमाणे २० वेगवेगळे लोककलांचे प्रकार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या समाजमाध्यमांवरून सादर केले जाणार आहेत. या निमित्ताने बऱ्याच मोठ्या कालावधीनंतर लोककलावंतांना प्रेक्षकांसमोर आपली कला सादर करण्याची संधी मिळणार आहे. दि. ३० नोव्हेंबर ते १९ डिसेंबर या कालावधीत दररोज रात्री ८ वाजता हे सादरीकरण प्रसारित केले जाईल. यात पोवाडा, वासुदेवाची गाणी, पोतराजाची गाणी, भराडी, हलगीवादन, वारू, लखाबाईची गाणी, लावणी आदी कार्यक्रम सादर होणार आहेत. या कार्यक्रमांचा सर्व रसिकांना समाजमाध्यमांवरून विनामूल्य लाभ घेता येणार आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते होणार आहे. पुणे जिल्ह्यातील या लोककलावंतांना दाद देण्यासाठी सर्व रसिकांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राचे मानद संचालक डॉ. प्रवीण भोळे यांनी केले आहे.

**Prabhat: 25.11.2020**

## News Paper Clippings During November 2020

*Section: Work of Appreciation*

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे 'लोककला २०२०' कार्यक्रम



**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भारतीय लोककला अभ्यास संशोधन आणि कल्याण केंद्राच्या वतीने 'लोककला २०२०' हा अभिनव उपक्रम राबवला जाणार आहे. केंद्रामार्फत भारतातील लोककलांच्या जतन, संवर्धन, प्रचार आणि प्रसारासाठी अनेक वेगवेगळ्या उपक्रम राबविले जातात. कोरोनासंसर्गामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे गेले सात-आठ महिने लोककलावंतांना त्यांचे कार्यक्रम सादर करता आलेले नाहीत. वंशपरंपरेने आपापल्या लोककलांचे जतन करणाऱ्या लोककलावंतांवर यामुळे उपासमारीची वेळ आलेली आहे. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी भारतीय लोककला अभ्यास, संशोधन आणि कल्याण केंद्रातर्फे 'लोककला २०२०' हा अभिनव उपक्रम राबवला जाणार आहे.

या उपक्रमांतर्गत सलग २० दिवस दररोज २० मिनिटे याप्रमाणे २० वेगवेगळे लोककलांचे प्रकार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या समाजमाध्यमांवरून सादर केले जाणार आहेत. या निमित्ताने अनेक महिन्यांनंतर लोककलावंतांना प्रेक्षकांसमोर आपली कला सादर करण्याची संधी मिळणार आहे. दि. ३० नोव्हेंबर ते १९ डिसेंबर या कालावधीत दररोज रात्री ८.०० वा. हे सादरीकरण प्रसारित केले जाईल. यात पोवाडा, वासुदेवाची गाणी, पोतराजाची गाणी, भराडी, हलगीवादन, वारू, लखाबाईची गाणी, लावणी आदी कार्यक्रम सादर होणार आहेत.

सदर कार्यक्रमांचा सर्व रसिकांना समाजमाध्यमांवरून विनामूल्य लाभ घेता येणार आहे. या उपक्रमाचे उद्घाटन दि. ३० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते होणार आहे. पुणे जिल्ह्यातील या लोककलावंतांना दाद देण्यासाठी सर्व रसिकांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राचे मानद संचालक प्रा. डॉ. प्रवीण भोळे यांनी केले आहे.

**Kesari: 28.11.2020**

# विद्यापीठाचे 'फिटनेस कॅम्पेन'

### एक ते 30 डिसेंबर दरम्यान आयोजन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

केंद्र सरकारच्या 'फिट इंडिया मूव्हमेंट'अंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांमध्ये एक ते ३० डिसेंबर दरम्यान 'फिट इंडिया थिमॅटीक कॅम्पेन' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या कॅम्पेनसाठी फिट इंडियाचे मोबाइल ॲप तयार करण्यात आले आहे. या कॅम्पेनच्या प्रसार आणि प्रचारासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक योजनेच्या विद्यार्थ्यांनी १० सेकंदाचा फिटनेस व्हिडिओ तयार करून, तो सोशल मीडियावर अपलोड करण्याचे आवाहन केले आहे.

देशातील विद्यार्थ्यांच्या सुदृढ आरोग्यासाठी आणि तंदुरुस्तीसाठी फिट इंडिया मोहीम राबविण्यात येत आहे. त्यानुसार केंद्रीय युवक आणि क्रीडा मंत्रालयाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना 'फिट इंडिया थिमॅटिक कॅम्पेन'मध्ये सहभागी करण्याच्या सूचना केल्या आहेत. हे कॅम्पेन एक ते ३० डिसेंबर या कालावधीत राबविण्यात येणार आहे, अशी माहिती राष्ट्रीय सेवा योजनेकडून देण्यात आली आहे. कॅम्पेन अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी एक डिसेंबरला १० सेकंदाचा फिटनेस जनजागृतीबाबत व्हिडिओ तयार करून तो सोशल मीडियावर अपलोड करण्याचे आवाहन केले आहे. या कॅम्पेनसाठी फिट इंडिया ॲप येत्या काही दिवसांत उपलब्ध होणार आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे व्हिडिओ मूल्यांकनासाठी आणि इतर विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी ॲपवर अपलोड करण्याच्या सूचना 'एनएसएस'कडून देण्यात आल्या आहेत. महाविद्यालयातील अधिकाधिक विद्यार्थ्यांनी कॅम्पेनमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन 'एनएसएस'कडून करण्यात आले आहे.

### प्रभात फेरी आणि सायकलिंग

'फिट इंडिया थिमॅटिक कॅम्पेन'साठी फिटनेस संदेशावर आधारित प्रभात फेरीचे आयोजन एक ते सहा डिसेंबर दरम्यान करण्यात येणार आहे. तर, सात ते ३० डिसेंबर या कालावधीत फिट इंडिया सायक्लोथॉन मोहिमेअंतर्गत सायकलिंग उपक्रम राबविण्यात येईल, अशी माहिती 'एनएसएस'कडून देण्यात आली. अधिक माहिती www.fitindia.gov.in या वेबसाइटवर मिळेल.



**Maharashtra Times: 28.11.2020**



## News Paper Clippings During November 2020

*Section: Research*

पुढारी

# सह्याद्री घाटात 'सह्याद्री काटेचेंडू' या नव्या वनस्पतीचा शोध

### बाम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, साठ्ये कॉलेजसह इटलीच्या शास्त्रज्ञांचे यश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सह्याद्रीच्या घाटामध्ये वनस्पतीची नवी प्रजाती सापडली असून 'एकिनोपस सह्याद्रिक' असे बोटॅनिकल नाव आहे. याला महाराष्ट्रातील वनस्पती शास्त्रज्ञांनी 'सह्याद्री काटेचेंडू' असे बोलीभाषेतील नाव दिले आहे.

सह्याद्रीच्या पश्चिम घाटामध्ये मोठी जैवविविधता आहे. त्यावर २०१९ पासून बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या वनस्पती शास्त्रज्ञांचा अभ्यास सुरू होता. यात तज्ज्ञ प्रा. हर्षल भोसले, साठ्ये महाविद्यालयाचे वनस्पती शास्त्राचे विद्यार्थी सुशांत मोरे, इटलीच्या कॅमेरिनो विद्यापीठाचे प्रा. फॅबिओ कॉन्टी यांनी ही नवी प्रजाती शोधून काढली आहे. नॉर्डिक जर्नल ऑफ बॉटनीमध्ये 'सह्याद्री काटेचेंडू'वर शोधनिबंध प्रसिद्ध झाला होता. ही टीम गेले वर्षभर या विषयवर संशोधन करीत आहे. यात विविध वनस्पतींसह सरपटणारे प्राणी, मासे यावरही संशोधन सुरू आहे. 'काटेचेंडू' या प्रवर्गातील १३० प्रजाती असून, या भागात ती असण्याची शक्यता आहे. ही स्थानिक प्रजाती या भागाची जैवविविधता वाढवणारी ठरली आहे.



**सहयाद्री घाटात सापडलेली ही काटेचेंडू वनस्पती.**

Pune Edition
Nov 1, 2020 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

## News Paper Clippings During November 2020

### Section: Miscellaneous



# हिंदीतही लोकमान्यांचा 'टिळक' असाच उल्लेख व्हावा

## साहित्यिक आणि भाषाप्रेमींचे पंतप्रधानांना पत्र

**पुणे** : भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचे थोर सेनानी लोकमान्य टिळक यांचा 'तिलक' असा हिंदीत उल्लेख करणे थांबवून केंद्र सरकारने सर्व हिंदी साहित्य, परिपत्रकांमध्ये 'टिळक' असेच म्हणावे, अशी मागणी मराठी साहित्यिक आणि भाषाप्रेमींनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे.

हिंदीमध्ये 'ळ' ऐवजी 'ल' हे मुळाक्षर वापरता येणार नाही, असे केंद्र सरकारच्या हिंदी विभागाने स्पष्ट केल्यानंतर मुंबईतील 'लोकमान्य टिळक टर्मिनस' आणि हिंदी भाषक प्रदेशात असलेले लोकमान्यांच्या नावाचे फलक त्यादृष्टीने बदलण्याची मागणीही मराठी भाषाप्रेमींनी केली आहे. मराठीतील आणि हिंदीच्या उपभाषांमधील शब्दाचा उच्चार हिंदीत करताना किंवा देवनागरीमध्ये लिहिताना 'ळ' हे मुळाक्षर डावलून 'ल'चा वापर आता करता येणार नाही, असे केंद्र सरकारने स्पष्ट केल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठविण्यात आले आहे. या पत्रावर डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. सदानंद मोरे आणि लक्ष्मीकांत देशमुख या तीन माजी साहित्य संमेलनाध्यक्षांसह अनेक लेखक आणि भाषाप्रेमींच्या स्वाक्षरी आहेत.

भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे थोर नेते लोकमान्य टिळक यांचा उल्लेख हिंदी प्रदेशात 'लोकमान्य तिलक' असा केला जातो. हिंदीच्या विविध लोकभाषांमध्ये 'ळ' उच्चार असल्याने व हिंदी विभागानेही तो आता त्यांच्या वर्णमालेत समाविष्ट केला. यामुळे 'तिलक' असा उल्लेख करण्यात कोणतेही औचित्य नाही, याकडे पत्रात लक्ष वेधण्यात आले आहे. त्यात म्हटले आहे की, सरकारने हिंदी साहित्य, परिपत्रके, फलक इत्यादीमध्ये लोकमान्य टिळक असाच उल्लेख करण्याच्या सूचना द्याव्यात. रेल्वेप्रमाणेच महामार्ग विभाग, विमानतळे, टपाल कार्यालये, बँका व आर्थिक संस्था, प्राप्तिकर कार्यालये, गृह व संरक्षण विभागाची कार्यालये, न्याय पालिका या सर्व ठिकाणी मूळ 'ळ' ऐवजी झालेला 'ल'चा उल्लेख काढून तो 'ळ' असा करावा, अशी मागणी साहित्यिकांनी केली आहे.

**Kesari: 11.11.2020**



## News Paper Clippings During November 2020

### Section: Miscellaneous



## कृषी विभागातर्फे राज्यात लागवडीचा पहिला प्रयोग

# महाबळेश्वरच्या भूमीला आता 'केशरी' साज

विश्वास पवार, लोकसत्ता

**वाई :** काश्मीरची ओळख असलेल्या केशराची महाराष्ट्रातील थंड हवेचे ठिकाण असलेल्या महाबळेश्वर येथे लागवड करण्यात येत आहे. राज्यात प्रथमच होत असलेली ही केशर लागवड राज्याच्या कृषी विभागातर्फे प्रायोगिक तत्त्वावर केली जात आहे. ही लागवड यशस्वी झाल्यास या गिरिस्थळाची स्ट्रॉबेरीसोबत केशरसाठीही ओळख तयार होऊ शकेल.

'काश्मिरी केशर' हा जगभरात उत्कृष्ट केशर म्हणून ओळखला जातो. या केशरचा भाव सरासरी साडेतीन लाख रुपये किलो असा आहे. काश्मीरमध्ये पंपोरे आणि कीरतवाड येथे या केशराचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते.

केशराच्या लागवडीसाठी विशिष्ट प्रकारचे हवामान, जमीन, प्रदेशउंची लागते. या उत्पादनासाठी लागणारे क्षेत्र हे समुद्रसपाटीपासून दोन ते अडीच हजार मीटर उंचीवरील असावे लागते. तेथील तापमान हे सरासरी १० डिग्री सेल्सियस असावे लागते. अशा ठिकाणी कंदाद्वारे एक फूट अंतरावर याची लागवड केली जाते. केशराची वाढ पंधरा ते (पान २ वर)

**होणार काय?** जगामध्ये भारत, स्पेन, इराक, फ्रान्स, इटली, तुर्की, चीन येथे केशराची लागवड केली जाते. भारतात ही लागवड फक्त काश्मीरमध्ये केली जाते. काश्मीर आणि महाबळेश्वरमधील हवामान, जमिनीचा अभ्यास करत राज्याच्या कृषी विभागातर्फे महाबळेश्वरमध्येही काही क्षेत्रावर केशर लागवडीचा प्रयोग घेण्यात येणार आहे.

लोकसत्ता Fri, 20 November 2020
https://epaper.loksatta.com/c/56466113



# महाबळेश्वरच्या भूमीला आता 'केशरी' साज

(पान १ वरून) पंचवीस सेंटिमीटरपर्यंत होते. याला गवतासारखी निमुळती होत जाणारी पाने, तर जांभळ्या रंगाची फुले येतात. या फुलांमध्येच पिवळसर केशरी कोष तयार होतो. साधारण ऑगस्ट ते सप्टेंबर महिन्यात लागवड केली जाते, तर डिसेंबर-जानेवारी महिन्यात त्याला फुले येतात. जानेवारी महिन्यात ही फुले खुडून उन्हात वाळवून त्यापासून केशर मिळवले जाते.

केशराच्या शेतीसाठी क्षेत्र महाबळेश्वर येथील गणेश जांभळे आणि मेटगुताड येथील दीपक व अशोक बावडेकर या प्रयोगशील शेतकऱ्यांची निवड केली आहे, अशी माहिती तालुका कृषी अधिकारी सुनील साळुंखे यांनी दिली.

**साडेतीनशे कंद आणले...**

महाबळेश्वरमधील केशर लागवडीसाठी काश्मीर येथील किरतवाड येथून कंद आणले आहेत. केशराचे हे कंद चोवीसशे रुपये किलोप्रमाणे मिळतात. एक किलोमध्ये पस्तीस ते चाळीस कं येतात. सध्या प्रायोगिक तत्त्वा साडेतीनशे कंद मागविण्यात आले आहेत. त्याचा खर्च कृषी साहाय्यकांनी स्वतःच्या खिशातून केला असून उत्पादन आल्यानंत शेतकरी त्याची परतफेड करणार आहेत.

> महाराष्ट्र कृषी विभाग महाबळेश्वर तालुक्यातील शेतकऱ्यांना येथील वातावरणाचा फायदा घेऊन नावीन्यपूर्ण शेती प्रयोग राबवण्यासाठी प्रोत्साहित करत असतो. येथील हवामान, जमीन हे केशरसाठी चांगले आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यास येथील शेतकऱ्यांना स्ट्रॉबेरीबरोबर उत्पन्नाचा आणखी एक चांगला स्रोत उपलब्ध होईल.
>
> – दीपक बोर्डे, कृषी साहाय्यक, महाबळेश्वर

लोकसत्ता Fri, 20 November 2020
https://epaper.loksatta.com/c/56474093

## Upcoming Events

# December 2020

| Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 ***Sant Jagnade Maharaj Jayanti***  | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

Image Courtesy: Google Images




*Other than the College Photos, Event Photos, Newspaper clipping images, all other mages in this Bulletin Issue are downloaded from Google Images., PInterest, Freepik.Com.*

*Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.*